
दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के




## सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष केला

**जयभिम उत्सव:** विविध ठिकाणाच्या जयंत्यांना पप्पू कागदे उपस्थित



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील तमाम शोषित, पिडीत, उपेक्षीत समाज बांधवांना धार्मिक गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी मानवतावाद व समतावाद या देशात प्रस्थापीत केला. सत्तेपेक्षा धार्मीक गुलामी, अंध-श्रद्धा, रूढी परंपरामध्ये जखडून-खितपत पडलेल्या समाज घटकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले विचार जोपर्यंत समाज बांधव आत्मसात करणार-नाहीत तोपर्यंत माणसासह देशाची प्रगती होणार नाही. हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर संघर्ष केला. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीउ जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी पालवण, देवी बाभुळगाव, रौळसगांव, चौसाळा, हिवरा पहाडी या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून आपल्या हक्क व अधिकारासाठी जागृत केले. मानवतावाद व समतावाद प्रस्थापित केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपकार आपण कितीही प्रयत्न केले तरी फेडू शकणार नाहीत. आपल्या सामाजिक परिवर्तनासाठी आंबेडकरी विचार धारा आत्मसात पान २ वर

## पदवीधर शिक्षकांचे उपोषण स्थगित

**सामंजस्य:** डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी अधिकारी पान २ वर

## केज पंचायत समितीत खाऊगिरी

**सवाल:** सामान्य जनतेला खाऊगिरीचा फटका




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:पंचायत समिती मधील अधिकारी कर्मचारी यांनी जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन लाचलुचपत करायला हवी आहे कारण केज पंचायत समिती मध्ये असा कोनी अधिकारी कर्मचारी राहिला नाही की चेरीमीरी लाच घेत नाही ९० टक्के अधिकारी कर्मचारी लाच घेतल्याशिवाय सही करत नाहीत किंवा काम करत नाही १० टक्के कर्मचारी आहेत फक्त निस्वार्थी पानाने काम करतात नाहीतर सगळे कर्मचारी लाच घेऊन काम करतात यांचा विचार सरकारने प्रशासनाने करायला हवा आहे अन्यथा एक दिवस असा येईल की गोरगरीब जनता योजना घेण्यासाठी समोर जानार नाहीत कारण केज पंचायत समिती मधील अधिकारी कर्मचारी यांचा असा कारभार पान २ वर

## बीड पोलिसांची गुटखा अड्ड्यावर छापा

**कारवाई:** साडेचार लाखाचा मुद्देमाल जप्त



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: शहर पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की शहरात काही ठिकाणी गुटखा साठा करून ठेवला आहे, आणि लवकरच तो माल पानटपरी, आणि किराणा दुकानदार वरून वितरित होणार आहे... यावरून पोलिसांनी पथक तयार करून छापा मारला असता, एकूण साडेचार लाखाचा मुद्देमाल मिळून आला आहे, यात मोमीन मोहम्मद तक्युदिन पिता फजिउद्दीन राहणार हत्तीखाना, बीड यास अटक करण्यात आली असून यातील आरोपी वाजेद हा फरार आहे. तसेच यामध्ये एक अल्पवयीन मुलगा सुद्धा ताब्यात घेण्यात आला होता. यामध्ये आणखी आरोपी निष्पन्न होणार असून हा माल कोठे कोठे पाठवला गेला होता, कोण कोणत्या पान टपरीवर हा सप्लाय केला पान २ वर

## सेवेत गैरवर्तन, ग्रामसेवक बडतर्फ

**दणका:** सीईओ आशिष येरेकरांची कारवाई



पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:अकोले तालुक्यातील समशेरपुर/ देवठाण ग्रामपंचायतचे तात्कालीन ग्रामविकास अधिकारी राजेंद्र किसन वर्पे यांना सेवेत गैरवर्तन व गैरव्यवहार केल्याप्रकरणी सेवेतून बडतर्फ करण्यात आले विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेल्या सातही दोषारोप सिद्ध झाल्याने त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी बडतर्फची कारवाई केली आहे

ग्रामसेवक वर्पे यांनी समशेरपुर देवठाण ग्रामपंचायत मध्ये वेगवेगळ्या आर्थिक वर्षात कोट्यावधी रुपयाचा संस्थेत अपहर व अनियमितता केली आहे या विरोधात जिल्हा परिषद प्रशासनाने नाशिक विभागीय पातळीवर चौकशी केली या चौकशीत त्यांचा वर आरोप ठेवण्यात आले ते सिध्द झाल्याने ग्रामपंचायतीच्या कामात सचोटी व वर्तणूक कर्तव्य यांच्या अधिन न राहाता सेवा वर्तणुकीचा भंग केला असल्याने कारवाई करण्यात आली आहे

तसेच याप्रकरणी त्यांना सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये याबाबत नोटीस पान २ वर

## महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव

**उपक्रम:** विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ९२० व्या जयंतीनिमित्त संत गुरुलिंग मंदिरात बेलवाडी येथे महात्मा बसवेश्वराच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून माजी नगराध्यक्ष सोमनाथ आप्पा हालगे व महाराष्ट्र वीरशेव लिंगायत सभेच्या जिल्हाध्यक्ष तथा भाजपाचे अध्यक्ष उमाताई समशेटे यांच्या हस्ते संपन्न झाले

यावेळी उमाताई समशेट्टी बोलताना म्हणाल्या की महात्मा बसवेश्वरांनी अकराव्या शतकामध्ये समानता व महिलांसाठी विशेष कार्य केले त्यांच्या कार्याचा ठसा समाजात आज सुद्धा दिसत आहे त्यांच्या त्या वेळच्या कार्यामुळे समाजामध्ये महिलांना समान वाटा मिळत आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती संत गुरुलिंग स्वामी मंदिराचे सचिव ड गिरीश चौधरी समर्थ शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव प्रभाकर ईटके वक्रेश्वर मंदिराची विश्वस्त सुभाष भिंगोरे, शिवकुमार व्यवहारे, हनुमान व्यायाम चे उपाध्यक्ष त्रिंबक काटकर पान २ वर

### सुट्टीची जाहीर सूचना

सर्वांना कळविण्यात येत आहे की,गुरुवार दि.१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र स्थापना दिन तसेच कामगार दिन असल्याने दैनिक पुण्यभूमी कार्यालयास सुट्टी असणार आहे. त्यामुळे शुक्रवार दि.२ मे २०२५ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची प्रतिनिधी, वाचक, जाहिरातदार, वितरक यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

## युद्धाचे ढग

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तानमध्ये युद्ध पेटण्याची शक्यता वाढली आहे. पहलगाममधील अतिरेकी हल्ल्यामागे पाकिस्तानचा थेट हात होता हे भारताने जगाला पटवून दिले आहे. त्यासाठी आवश्यक असलेले गुप्तचर पुरावेसुद्धा सादर केले आहेत त्यामुळे भारताला जगभरातून पाठिंबा मिळत आहे. पंतप्रधान मोदींनी १६ देशांच्या प्रमुखांशी थेट संवाद साधला आहे. सर्व नेत्यांनी या हल्ल्याचा कठोर शब्दांत निषेध केला असून भारताला पाठिंबा दिला आहे. भारत–पाकिस्तान सीमेवर तणावाची परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना इराणने म्हटले आहे की, दोन्ही देशांनी शांततेची भूमिका घ्यावी, तणाव कमी करावा. इराणचे परराष्ट्रमंत्री सैयद अब्बास म्हणाले, भारत आणि पाकिस्तान आमचे शेजारी देश आहेत. त्यांच्याशी आमचे शेकडो वर्षापासून सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध आहेत.

इतर देशांप्रमाणेच आम्हीही या संबंधांना प्राथमिकता देतो. अशा कठीण परिस्थितीत दोन्ही देशांनी सामंजस्याने भूमिका घ्यावी. सौदी अरेबियानेसुद्धा भारत–पाकमध्ये वाढत असलेल्या तणावावर चिंता व्यक्त केली आहे. सौदीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तान आणि भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांना फोन करून परिस्थितीची माहिती घेतली. अमेरिकेनेदेखील भारत–पाकमधील तणावपूर्ण परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. भारत–पाक हे दोन्ही देश आमच्यासाठी जवळचे आहेत. दोन्ही देशात कायमचा तणाव राहिला आहे मात्र ते त्यावर तोडगा काढतील, असा आम्हाला विश्वास वाटतो. पाकिस्तान उसने अवसान आणून युद्धाच्या पोकळ धमक्या देत असला तरी प्रत्यक्ष युद्ध पेटलेच तर भारतापुढे त्यांचा क्षणभरही टिकाव लागणार नाही. पाकमध्ये अंतर्गत बंडाळी माजली आहे. स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीसाठी बलूच बंडखोर पाक सैन्यावर सतत हल्ले चढवत आहेत.

कधी रेल्वे हायजॅक तर कधी पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर हल्ले अशा पद्धतीने बलूच लिबरेशन आर्मी सातत्याने पाकिस्तानी सैन्याला लक्ष्य करीत आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्येसुद्धा असंतोष उफाळून आला आहे. हजारो नागरिक पाकिस्तान सरकार विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. पाकिस्तान सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली जात आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावा या मागणीने जोर धरला आहे. आधीच पाकिस्तानचे दोन तुकडे झाले आहेत. आता तिसरा तुकडा पाडल्याशिवाय त्यांची गुर्मी उतरणार नाही, असे मत भारतातील संरक्षण तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. यामुळे भारताने कोणत्याही प्रकारची कारवाई करून बळकावलेला काश्मीर ताब्यात घ्यावा, अशी मागणी देशभरातून केली जात आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराच्या तिन्ही दलांकडून युद्ध सराव सुरू आहे. सीमेवर पाककडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. त्याला चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. आतापर्यंत ९ दहशतवाद्यांची घरे उडवून देण्यात आली आहेत.

साडेचारशेच्या आसपास संशयित ताब्यात घेण्यात आले आहेत. गत दोन दशकांमधील हे सर्वांत मोठे कोम्बिंग ऑपरेशन आहे. दहशतवाद्यांना पोसणा–या पाकच्या पापाचा घडा आता भरला आहे. दहशतवादी कारवायांना बळ देत त्यांनी भारताविरुद्ध छुपे युद्ध सुरू ठेवले होते. आता पाकला धडा शिकवावा, अशी असंख्य भारतीयांची मागणी आहे. भारत आपल्यावर कधीही हल्ला करू शकतो, असे पाकिस्तानी लोकांनाही वाटते म्हणून ते काळजीत पडले आहेत. पाकिस्तानी प्रशासनही हादरून गेले आहे म्हणूनच की काय पाकिस्तानी लष्करामध्येही हालचाली वाढल्या आहेत. भारत–पाक सीमेवर वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी लष्करातील सुमारे ५ हजार जवानांनी आपल्या नोकरीवर पाणी सोडले आहे. पाकिस्तानी लष्करातील सुमारे ५ हजार सैनिक आणि अधिका–यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले असून ते आपापल्या घरी परतले आहेत म्हणे.पेशावर स्थित पाक लष्कराच्या ११ व्या कोअरचे कमांडर ले. जन. उमर बुखारी यांनी पाक लष्करप्रमुख असीम मुनीर यांना पत्र पाठवले असून त्यांना या राजीनाम्यांची माहिती देण्यात आली आहे. हे राजीनामा सत्र थांबवण्यात यावे कारण या कृतीमुळे लष्करात वेगळा संदेश जात असून त्यामुळे इतर सैनिकांचे खच्चीकरण होऊ शकते, असेही पत्रात म्हटले आहे. पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे मोठे बंधू माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी भारताशी पंगा न घेण्याचा सल्ला दिल्याचे सांगण्यात येते. नवाज शरीफ यांनी भारतासोबतचे ताणलेले संबंध सुधारण्यासाठी शाहबाज शरीफ यांना राजनैतिक पातळीवर हा प्रश्न सोडवण्याचा सल्ला दिला आहे. भारतासोबत युद्ध होणे पाकच्या दृष्टीने हिताचे नाही, असे त्यांनी म्हटले आहे. युद्धाची शक्यता लक्षात घेऊन पाकिस्तानातील अनेक लष्करी अधिका–यांनी आणि नेत्यांनी आपल्या कुटुंबीयांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्राने दोन्ही देशांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

संयुक्त राष्ट्राने २४ एप्रिलला पत्रकार परिषद घेऊन पहलगाममधील कट्टरतावादी हल्ल्याचा निषेध केला तसेच दोन्ही देशांनी जास्तीत जास्त संयम बाळगावा तसेच दोन्ही देशांमधील परिस्थिती आणखी बिघडू नये याची काळजी घ्यावी, असे म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्येक भारतीयाची ही भावना आहे की, पाकिस्तानविरुद्ध निर्णायक जोरदार कारवाई केली जावी. पाकिस्तान दहशतवाद्यांना कसं पोसतो, ट्रेनिंग देतो ते सा–या जगाला माहित आहे. दहशतवाद्यांना तयार करण्याचा हा पाकिस्तानी पॅटर्न आहे. तरुणांची माथी भडकावली जातात, त्यांना चिथावणी दिली जाते आणि मग हातात हत्यार देऊन त्यांना ट्रेनिंग दिलं जातं. एवढं सारं करूनही पाकिस्तान जबाबदारी झटकतो; परंतु परदेशातील एजन्सीकडून सत्य समोर येतय!

# आरओ प्लांट देऊन भागविली तहान!

## ऋणानुबंध:अमर पाटीलांनी सामाजिकता जोपासली

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथील विद्या विकास हायस्कूल या शाळेला याच शाळेतील सहशिक्षक अमर बापूसाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साई स्वाध्याय मंडळ गोवा यांच्या सौजन्याने शाळेच्या भौतिक सुविधा, शैक्षणिक विकास यासाठी एक लाख बारा हजार रुपयांची छएत्रद्ध द्वारे देणगी देऊन शैक्षणिक कार्यात हातभार लावला असून त्यासाठी याच शाळेतील सहशिक्षक येरमाळा येथील अमर बापूसाहेब पाटील यांनी साई स्वाध्याय केंद्राशी अनेक प्रयत्न करून एक लाख बारा हजार रुपयाची मदत मिळविली आहे या मदतीतुन शाळेतील मुलांना बसण्यासाठी बेंचेस खरेदी करून शाळेत बेंचेस उपलब्ध झाले आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार आहे असे शाळेचे मुख्याध्यापक पांचाळ यांनी सांगितले तेवढेच नाही तर अमर पाटील यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाण्याची सुविधा प्राप्त व्हावी या उद्देशाने या शाळेसाठी आर ओ प्लांट भेट



दिला आहे यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते अमर पाटील यांनी एक



आदर्श निर्माण केला आहे असे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे या मदतीबद्दल शाळेने साई स्वाध्याय मंडळ



गोवा आणि पंढरपूर केंद्राचे व सहशिक्षक अमर पाटील सर यांचे आभार मानले आहेत.

## पान एक वरून

**सामाजिक परिवर्तनासाठी**

रण्याची गरज आहे. यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, स्वप्निल मस्के, मनोज पवार, सुहास मस्के, राष्ट्रपाल साबळे, ॲड. श्रीकांत साबळे, आकाश साबळे, कृष्णा साबळे, रणजीत सिनगारे, बाळासाहेब गव्हाणे, भास्कर जावळे, आप्पा शेळके,राजेंद्र शेळके, प्रकाश शेळके, अजित सावंत, अतुल चव्हाण, संतोष सोनवणे, अमोल वाघमारे, कृष्णा वाघमारे, विकास वाघमारे, यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

**पदवीधर शिक्षकांचे उपोषण**

आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फ ुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते, दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

**केज पंचायत समितीत**

झाला पैसे द्या आणी सही घ्या नाहीतर बोंबलत बस कामही होनार नाही आणी कामाचा निधी सुध्दा देण्यात येणार असे स्पष्ट मत केज पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी व्यक्त करतात मग शासन यांना पगार का देत आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे शासनाने केज पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचारी यांचा पगार बंद करून लाचलूचपत करुन तुमचा पगार घ्या असे आवाहन केले पाहिजे मग अधिकारी कर्मचारी यांना पगार म्हणजे काय असते समजेल व नागरिकांना लुटनार नाहीत तरी केज पंचायत समिती अधिकारी कर्मचारी चेरीमेरी घ्यायची कधी बंद करणार निस्वार्थ पने काम कधी करणार व अशा अधिकारी कर्मचारी यांच्यावर सीईओ कार्यवाही कधी करणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**बीड पोलिसांची गुटखा अड्ड्यावर**

जात होता, याचा तपास करुन निष्पन्न झालेल्यांना आरोपी करुन यामध्ये पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहेत. यातील अटक आरोपीला तीन दिवसांची पीसीआर मिळाली आहे.

पोलिस अधीक्षक श्री नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पी आय शितलकुमार बल्लाळ पोस्ट बीड शहर व एपीआय बाबा राठोड तसेच पीएसआय संदीप नेवरे साहेब यांच्या डी बी टीमने जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद, सुशेन पवार, मनोज परजने, सचिन अलगट , गोवर्धन सोनवणे, तांबरे, अयोध्या डोके , शहाबाई कांबळे, शौकत यांनी ही कारवाई केली.

**सेवेत गैरवर्तन, ग्रामसेवक**

बजावण्यात आली होती संबंधित नोटीसेला त्यांनी सादर केलेल्या खुलासा समर्थनीय कारण सादर केलेली नाही यामुळे त्यांचा खुलासा अमान्य करत त्यांच्यावर बडतर्फेची कारवाई करण्यात आली असल्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी काढले आहेत

ग्रामसेवक वर्पे यांच्यावर बडतर्फ कारवाई करण्यात आली असल्याने या कारवाईमुळे ग्रामपंचायत मध्ये गैरवर्तन व अपहर करणाऱ्यांना मोठा चाप बसणार असल्याची चर्चा होत आहे.

**महात्मा बसवेश्वर जयंती**

श्रीमती गोदावरी बाई चौधरी

विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम बुद्रे सचिव प्रा.सुधीर फुलारी सर उपाध्यक्ष शिवकुमार केदारी पत्रकार आत्मलिंग शेटे, संतोष जुजगर महाराष्ट्र वीरशैव लिंगायत तालुकाध्यक्ष माजी नगरसेवक महादेव ईटके महाराष्ट्र वीरशैव सभेचे शहराध्यक्ष नितीन समशेट्टी शिवसेनेचे माजी नगरसेवक रमेश चौडे विकास प्रतिष्ठानचे सहसचिव विकास हालगे वक्रेश्वर देवस्थान सदस्य प्रकाश खोत आधी यावेळेस मंचावर उपस्थित होते यावेळी भारतीय जनता पार्टीचे परळी शहराध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सौ उमाताई समशेट्टी,हनुमान व्यायाम शाळेच्या अध्यक्षपदी वैजनाथ इटके, सामाजिक कार्यकर्ते ड मनोज सांकाये सामाजिक कार्याबद्दल, रुद्र भूमी उपाध्यक्षपदी निवडीबद्दल विकास हालगे, महादेव ईटके यांची हनुमान व्यायाम शाळेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला या स्पर्धेमध्ये रांगोळी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण केल्याबद्दल श्री शेखर फुटके सर गंगाधर शिरसागर सर शिवप्रसाद रजनाळे सर राजेश साखरे सर सोमनाथ गोपनपाळे सर आदींचा सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन स्वामी यांनी केले तर संचलन अशोक नावंदे सर आभार दत्तात्रय गोपनपाळे यांनी केले यावेळी रांगोळी स्पर्धेत प्रथम खुला गट भाग्यश्री स्वामी द्वितीय पूजा शिरसागर तृतीय श्रुती हालगे यांनी बक्षीस पटकावले लहान गटात प्रथम श्रेया घोंगडे द्वितीय पूर्वा प्रकाश फडकरी तृतीय रुद्रायणी परमेश्वर चौधरी निमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा व वकृत्व स्पर्धा त्यांनी बक्षीस पटकावली चित्रकला स्पर्धेत प्रथम श्रेया घोंगडे द्वितीय रुद्र महेश बुद्रे तृतीय समीक्षा रामेश्वर चौधरी यांनी पारितोषिक पटकावले वक्तृत्व स्पर्धेत प्रथम समीक्षा रामेश्वर चौधरी दुतीय समृद्धी रामेश्वर चौधरी तृतीय चिरंजीव सिद्धांत शिवकुमार चौडे यांनी पारितोषिक पटकावली यावेळी चित्रकलेत बालगटात उत्तेजनार्थ कुमारी स्वरा गणेश स्वामी, समर्थ चौधरी, राघव रामलिंग चौंडे, पार्थ सिद्धेश्वर घोंगडे, विश्वास सचिन सर्वज्ञ यांना मिळाली यावेळी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या स्पर्धकांना ३१०० द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्यांना २१०० रुपये तृतीय क्रमांक पटकावणारांना अकराशे रुपये व सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आली यावेळी बीड रेल्वे समितीचे जिल्हाध्यक्ष जीएस सौंदळे गुरुजी माजी मुख्याध्यापक रामलिंग आप्पा राजनळे रंगनाथ आप्पा इटके श्रीशैल बुरकुल शिवकुमार चौंडे महादेव आप्पा फडकरी शैलेश काटकर नाईकवाडे आप्पा इंजिनीयर अरविंद बेल्लाळे तलाठी रमाकांत गुजर प्रमोद गुजर बाळू राजमाने शिरीष तोडकरी शिवलिंग आप्पा वाघमारे उमाकांत पोपडे प्रा. चंद्रकांत खानापुरे सोमनाथ राजनळे गौरीशंकर मोदी सर सिद्धेश्वर घोंगडे संजय कोरे नरेश पिंपळे संदीप चौधरी अरविंद चौधरी परमेश्वर चौधरी अवधूत बुधवंत आधी सह महिला व पुरुष समाज बांधव बहुसंख्य संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

**सुदृढ आरोग्य प्रत्येकाचा**

खड्यांच्या शस्त्रक्रिया होतील,तसेच २ अँजिओग्राफी व ६ एम.आर.आय. तपासण्या करून घेण्याचा सल्ला तज्ञ डॉक्टरांनी दिला आहे. शिबिराच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारच्या एकूण ६५ शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. सर्व सेवाभावी डॉक्टर्स, आरोग्यमित्र आणि स्वयंसेवकांनी यावेळी महत्त्वपूर्ण योगदान दिले. जयंती उत्सव समिती मधील तरुणांच्या पुढाकाराने राबविलेल्या या उपक्रमात समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा संकल्प साकारला गेला. यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सक्रिय सहभाग आणि जनतेचा मोठा प्रतिसाद हा सामाजिक एकतेचा व सामाजिक बांधिलकीचा सकारात्मक पुरावा ठरला. ही फक्त सुरुवात आहे, यापुढेही आम्ही सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहू असा विश्वास डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. शिबिराच्या माध्यमातून खऱ्याखुऱ्या गरजवंतांना आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी जयंती उत्सव समितीने राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे डॉ. शेटे म्हणाले. शिबिर यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील बहुसंख्य तरुणांनी परिश्रम घेतले. अनिल देशमाने यांनी अल्पोपहाराची उत्तम व्यवस्था केली होती.

**उन्हामुळे आचनक पेटला ट्रक**

त्यांनी फोम आणि पाणी याचा वापर करून आग नियंत्रणात आणली. सदरील आग औष्णिक विद्युत केंद्राच्याअग्निशमन गाडीने आग आटोक्यात आणली.भर चौकात मालवाहू ट्रकला आग लागण्याच्या संदिग्ध कारणाची आणि ईतर बाबींचा तपास परळी संभाजीनगर पोलीस करत आहेत. या प्रकरणात गुन्हा दाखल झालेला नाही.

**ट्रॅक्टर मोर्चात सहभागी**

रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती ते जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा विराट ट्रॅक्टर मोर्चा धडकणार आहे या मोर्चात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी हजारोच्या संख्येने आपले ट्रॅक्टर घेऊन उपस्थित राहावे याकरिता जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे शहर प्रमुख गजानन जाधव उपशहर प्रमुख लुकमान कुरेशी, सुदन अंभोरे, विनायक मापारी हे गावोगावी जाऊन कॉलर बैठका घेऊन शेतकऱ्यांना या मोर्चाची माहिती देऊन त्यांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करीत आहेत

**परळीत सद्भावना संकल्प**

रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. याआधी मस्साजोग ते बीड व नागपूर शहरात सद्भावना यात्रा काढण्यात आली, जनतेने या यात्रांना प्रचंड प्रतिसाद दिला. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.

**जन आक्रोश मोर्चाला**

काही नवीन कायदे करण्यात येत आहेत. ते हिंदू मुस्लीम दरी निर्माण करणारे व बहुजनामध्ये तेढ निर्माण करणारे कायदे आहेत. महाराष्ट्र जन सुरक्षा अधिनियम २०२४ हा कायदा रद्द करावा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केलेल्या आरोपींना तात्काळ अटक करावी. ट्रोसीटी अंतर्गत गुन्हे दाखल करणाऱ्यांवर दरोडा, चोरी व पोस्को अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येतात. त्याची खात्री केल्या शिवाय कारवाई होऊ नये. तसेच वक्फ संशोधन बील २०२५ मागे घेण्यात यावे. अशी एकमुखी मागणी यावेळी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आलीयावेळी मौलाना असलम, माजी नगरसेवक सुनील पवार, सुनिल चांदणे, सागर साळवे, संदिप कोकाटे,अनुसंगम शिंदे, इम्रान सय्यद, असलम सय्यद, बबनराव साळवे दादू साळवे, किरण साळवे, मन्सूर पठाण, सत्तार शेख, रवी कर्डक, बबलू कर्डक, धम्ममेघा जाधव रवींद्र शिरसाठ आदी उपस्थित होते नायब तहसीलदार संध्या दळवी यांना निवेदन देण्यात आले

**माहिती न देणे आले**

२०२५ रोजी गौतम वाघमारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र, वाघमारे यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. पुढे, गटविकास अधिकाऱ्यांनी दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी स्मरणपत्र–१ पाठवले, तरीही कोणतीही प्रतिक्रिया मिळाली नाही.परिणामी, गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांनी दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) (ग्रा.प.) जिल्हा परिषद बीड यांच्याकडे गौतम वाघमारे यांच्याविरोधात प्रशासकीय कारवाई करण्यासाठी पत्र पाठवले आहे. सदरील प्रकारावरून स्पष्ट होते की, निमगांव (मा) ग्रामपंचायत कार्यालयातील गैरकारभार व भ्रष्टाचार दडपण्यासाठीच माहिती लपवली जात आहे. कायद्याचे उल्लंघन करून जबाबदारी टाळणाऱ्या अधिकारी विरुद्ध तातडीने कडक प्रशासकीय कारवाईची मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात अशोक कातखडे यांनी सांगितले की, ग्रामपंचायत कार्यालयातील भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी आणि प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी मी शेवटपर्यंत लढा देणार आहे. आवश्यकतेनुसार या प्रकरणाची दखल न्यायालयाकडेही घेतली जाणार आहे.या सर्व प्रकारामुळे ग्रामपंचायत विभागात एकच खळबळ उडाली आहे.

**पाणीप्रश्नासाठी कायम शेतकऱ्याच्या**

मागण्यांसाठी गेल्या वर्षभरापासून शेतकर्यांचे लोकलढा आंदोलन सुरू आहे. या शेतकर्यानी मार्चमध्ये १९ दिवस उपोषण केले होते. यावेळी खासदार रजनीताई पाटील यांनी शेतकर्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले होते. यामुळे शेतकर्यांनी रजनीताई पाटील यांची भेट घेऊन पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे साकडे घातले. यावेळी खासदार रजनीताई पाटील म्हणाल्या, की शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणार. या भागातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस अधिक भिषण होत आहे, याचा परिणाम शेती व शेतकर्यांवर होत आहे. त्यामुळे पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे यावेळी रजनीताई पाटील म्हणाल्या.

**बोगस कामाची चौकशी**

खडीकाम व डांबरीकरण, साईड पंख्याचे काम सुरु असतांना सदरील गुत्तेदारास या कामा सदर्भात माहीती देऊन व सुरु असलेले काम हे चुकीच्या पध्दतीने होत असल्या बाबत वारंवार तोंडी सुचना देवुन देखील त्या गुत्तेदाराने आमच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करुन रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे अशी लेखी तक्रार कैलास (भाऊ) मुंडे यांनी केजचे गटविकास अधिकारी यांना २८ एप्रिल रोजी निवेदनाद्वारे देऊन संबंधीत गुत्तेदाराची व या कामाची देखभाल करणा–या अधिका–याची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

**कोरडेवाडीतले काम**

कोरडेवाडी येथे सुरू असलेल्या लघुपाटबंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होत असताना संमंधीत प्रशासनान कोमात आणी गुत्तेदार जोमात आहे यांचे कारण काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तरी लघुपाटबंधारे विभागाचे संमंधीत प्रशासनाने कोरडेवाडी येथे सुरू असलेल्या पाटबंधाऱ्यांचे कामाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**आंबेडकरी विचार तळागाळात**

यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, किशोर कांडेकर, शाहु डोळस, सुभाष तांगडे, कैलास घुगे, बाप्पासाहेब घुगे, सुमंत कुटे, भैय्यासाहेब वाघमारे, रेवण कसबे, मायाताई मिसळे, सुंदरराव चव्हाण, सतिष शिंदे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, फुलचंद गारे, मनोज ससाणे, महादेव इंगोले, सुदाम ससाणे, संजय साबळे, भाऊसाहेब दळवी,ज्ञानेश्वर शिंदे, अनिल आरकडे, भैय्या मस्के, रतन वाघमारे, शाम वीर धम्मा पारवेकर, महेश कागदे, आप्पा मिसळे, बाबू मिसळे, प्रकाश मिसळे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.


**जन आक्रोश महा आंदोलन**

साठे यांचे नातु आदरणीय सचिन भाऊ साठे यांचा हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. या वेळी जिल्हाध्यक्ष किरण भाऊ कांबळे, मराठवाडा उपाध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, कळंब तालुका अध्यक्ष धनंजय भाऊ ताटे,पुणे जिल्हाध्यक्ष विकास भाऊ झोंबाडे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील जन आक्रोश महा आंदोलन मोर्चास लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी आदरणीय सचिन भाऊ साठे यांनी केले. या बैठकिस राज्यातील कार्यकर्ते व सकल मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जागतिक परिषदेत चिंचवड चरखा संघाला मिळाली संधी



◆ पिंपरी (प्रतिनिधी):

२५ आणि २६ एप्रिल २०२५ रोजी हैदराबाद येथे पार पडलेल्या पहिल्या भारत शिखर परिषदेस चिंचवड चरखा संघाला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. तेलंगणा राज्य सरकारच्या वतीने ही शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १०० देशातून ४५० प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. यामध्ये चिंचवड चरखा संघाचे मयूर जयस्वाल यांना तेलंगणा मुख्यमंत्री रेवता रेड्डी यांच्या वतीने विशेष आमंत्रित करण्यात आले होते.

दोन दिवस चाललेल्या परिषदेमध्ये जागतिक स्तरावरील न्याय या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये जगातील अनेक देशांचे मंत्री, खासदार, सामाजिक संस्थेत काम करणारे अनेक दिग्गज पदाधिकारी या ठिकाणी उपस्थित होते. युवक व राजकारण, लैंगिक समानता न्याय, हवामान बदल, पर्यावरण, आर्थिक असमानता, अशा विविध समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. देशाचे विरोधी पक्ष नेते श्री राहुल गांधी यांनी या परिषदेस संबोधन केले. तेलंगणाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार आमदार, भारतातील सामाजिक क्षेत्रात काम करणारे तज्ञ या ठिकाणी उपस्थित होते. चिंचवड चरखा संघाच्या वतीने या परिषदेत महात्मा गांधी यांचे तत्त्वज्ञान व त्यांनी केलेले कार्याची माहिती विविध देशातून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना देण्यात आली.

महात्मा गांधी व स्वातंत्र्य लढ्याचे प्रतीक असलेला चरख्याचे प्रशिक्षण यावेळी सर्व प्रतिनिधींना देण्यात आले. चरख्याची सुरुवात त्यातून निर्माण झालेला स्वातंत्र्य संग्रामाचा लढा, स्वदेशीचा नारा, स्वयंरोजगार अशा अनेक प्रकारची माहिती विदेशी प्रतिनिधींनी जाणून घेतल्या. सूतकताईचा अनुभव त्यांच्यासाठी मुख्य आकर्षण ठरले.

# पुणे जिल्ह्यात मान्सूनपूर्व कामांचे नियोजन करून कामे वेळेत करावीत

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

◆ पुणे (प्रतिनिधी):

मान्सूनपुर्व करावयाचे कामांचे सुक्ष्म नियोजन करुन ती सर्व कामे पावसाळ्यापूर्वी वेळेत पूर्ण करावीत, कामे करतांना सर्व सबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील तसेच त्यांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी अधिकारी वर्गाला दिले.

यावेळी जितेंद्र डुडी म्हणाले, पाटबंधारे विभागाने पूररेषा निश्चित करून त्याची माहिती प्रशासनाला, महापालिकांना द्यावी. त्याप्रमाणे पूररेषेखाली येणाऱ्या झोपडपट्ट्या,अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी. पाणी पातळीत वाढ झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत पूर नियंत्रण आराखडा निश्चित करावा. धरणातून सोडण्यात



येणाऱ्या पाण्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना वेळेत मिळेल याबाबत नियोजन करावे. सर्व धरणांची बांधकाम तपासणी पावसाळ्यापूर्वी करून घ्यावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पूल, रस्ते, पूरबाधित गावे आदीबाबतची माहिती सर्व संबंधित विभाग तसेच नागरिकांना माहिती द्यावी. धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पूल, रस्ते, पूरबाधित गावांची पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सर्व रस्त्यांना बाजूला पट्टे भरून घ्यावेत. पावसाळ्यात बंद रस्त्याला असलेले पर्यायी रस्त्याबाबत माहिती नागरिकांना द्यावी. आणीबाणीच्या वेळी उपयोगात येणारी बुलडोझर्स, वॉटरटँकर्स, डंपर्स, अर्थमुव्हर्स, डिवॉटरींग पंप्स, जनरेटर्स, ट्री कटर्स, फल्ड लाईट, आर.सी.सी.कटर्स, इत्यादी साहित्याची चालू स्थितीमध्ये असल्याबाबत याची खात्री करुन घ्यावी.

आरोग्य विभागाने संभाव्य आपत्कालिन परिस्थितीचा विचार करुन नागरिकांना तत्काळ सेवा मिळेल, याबाबत नियोजन करावे. तालुकानिहाय रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे साठा तयार ठेवावे. साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. मान्सून काळात सर्पदंशाचे प्रमाण लक्षात घेऊन पुरेसा सर्पविष प्रतिबंधक लस साठा उपलब्ध ठेवावा, असे निर्देश अधिकारी वर्गाला त्यांनी दिले.

# लोणावळ्यात ठाकरे गटाला धक्का

◆ पिंपरी (प्रतिनिधी):

**माजी नगरसेविका, उपशहरप्रमुखांचा शिवसेनेत प्रवेश**

लोणावळ्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून ज्येष्ठ माजी नगरसेविका कल्पनाताई आखाडे, नगरसेविका सिंधूताई परदेशी यांच्यासह उपशहरप्रमुख, विविध पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्वांचे शिवबंधन बांधून सर्वांचे पक्षात स्वागत केले. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल अशी ग्वाही दिली.

यावेळी शिवसेना महिला उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख दत्ताभाऊ केदारी, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, युवासेना पुणे जिल्हा समन्वय सागर पाचरणे, शिवसेना उप तालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, शिवसेना महिला लोणावळा शहर संघटिका मनीषाताई भांगरे, शिवसेना मावळ विधानसभा समन्वयक अंकुश देशमुख, शिवसेना उपशहर प्रमुख प्रकाश पाठारे, शिवसेना लोणावळा समन्वयक नंदू कडू, विशाल पाठारे उपस्थित होते.

# पावसाळा येऊन ठेपला असतानाही 'पब्लिक ॲड्रेस सिस्टिम' यंत्रणा बसविण्याकडे पालिकेची डोळेझाक

◆ पुणे (प्रतिनिधी):

शहरात मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे मुठा नदीला पूर आला. खडकवासला धरणातून पाण्याचा अचानक विसर्ग केल्याने मुठा नदीकाठच्या सोसायट्या, वस्त्यांना मोठा फटका बसला. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या नागरिकांना पुराची माहिती तत्काळ मिळावी, यासाठी महापालिकेने नदीकाठच्या परिसरात अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त 'पब्लिक ॲड्रेस सिस्टिम' बसविण्याचे निश्चित केले आहे. मागील वर्षी पुराचा फटका बसल्यानंतरही आणि अवघ्या एक-दीड महिन्यावर पावसाळा येऊन ठेपला असतानाही यंत्रणा बसविलेली नाही.

नागरिकांना पुराबाबतचा संदेश एकावेळी देता यावा, यासाठी पुणे महापालिकेकडून 'पब्लिक ॲड्रेस सिस्टिम' ही अद्ययावत यंत्रणा बसविली जाणार होती. आता पावसाळा तोंडावर असताना अद्याप यंत्रणा बसविलेली नाही. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने यंत्रणा टप्प्याटप्प्याने किंवा 'आयसीसीसी'समवेत करून दुधाची तहान ताकावर भागविण्याचा प्रकार महापालिकेकडून सुरू आहे.

खडकवासला ते खराडीपर्यंत पुराचा फटका बसणाऱ्या ५० हून अधिक ठिकाणी यंत्रणा बसविली जाणार होती. या कामासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने आर्थिक तरतुदीची मागणीही केली होती. प्रत्यक्षात केवळ ५० लाखांचा निधी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पदरात पडला. पुरेशा निधीअभावी यंत्रणा बसविणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाने आता पारंपरिक पद्धतीने





> पब्लिक ॲड्रेस सिस्टीम बसविण्यासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. या निधीतून अद्ययावत यंत्रणा बसविण्याचे काम होईल. तसेच 'आयसीसीसी' यंत्रणेचाही त्यात वापर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.
>
> **- महेश पाटील**, अपर आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन विभाग

### यंत्रणा खालील प्रमाणे काम करते

- पूरस्थिती, नैसर्गिक आपत्ती, हवामान खात्याकडून मिळणाऱ्या धोक्याच्या इशाऱ्याबाबत एकावेळी अनेकांना सूचना देता येईल
- सरकारच्या महत्त्वाच्या योजनांचीही माहिती एकावेळी देणे शक्य
- मोबाइलमधून एक कॉल केल्यानंतर एकावेळी यंत्रणा बसविलेल्या ठिकाणी संदेश पोहोचतो
- सौरऊर्जेवर चालणाऱ्या यंत्रणेसाठी विशिष्ट प्रणालीचा वापर
- यंत्रणेचे नियंत्रण जबाबदार व महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्याच हाती
- १५ ते २० फूट उंचीवरील पुलावर लोखंडी बॉक्समध्ये यंत्रणा
- बॉक्समध्ये अम्प्लिफायर व मोबाईल सीम बसणारे 'जीएमएस'चे एक युनिट समाविष्ट
- शहरातील विशिष्ट परिसरात संदेश देण्याचाही पर्याय यंत्रणेत उपलब्ध

वाहनांद्वारे पुराच्या स्थितीबाबत नागरिकांना सतर्क करणे, तसेच 'इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर'द्वारे (आयसीसीसी) तयार केल्या जाणाऱ्या फायबर नेटवर्क सिस्टिमचा वापर करून यंत्रणा सुरू करण्याचा मार्ग निवडला आहे. किरकोळ कामांवर कोट्यवधींची उधळपट्टी करणाऱ्या महापालिकेला नागरिकांच्या जिवाशी निगडित यंत्रणेवर खर्च करताना हात आखडता घ्यावा लागत असल्याची सद्यःस्थिती आहे.

कोल्हापूरच्या पंचगंगा नदीला काही वर्षांपूर्वी पुराचा मोठा फटका बसला. त्याची गांभीर्याने दखल घेत कोल्हापूरचे तत्कालीन पालकमंत्री सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून देशात पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये 'पब्लिक ॲड्रेस सिस्टिम' बसविण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्यातील ६०० हून अधिक गावे व शहरातील ६० ठिकाणी यंत्रणा बसवून कार्यान्वित केली आहे. जर कोल्हापूर महापालिकेला एकावेळी यंत्रणा बसविणे जमू शकते; तर पुणे महापालिकेला का शक्य नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## वेचक

### पुणे विमानतळाच्या धावपट्टीवर बिबट्याचे दर्शन

**पुणे :** लोहगाव पुणे विमानतळाच्या धावपट्टीवर बिबट्याचे दर्शन झाले. यामुळे विमानतळ अधिकारी, सुरक्षा कर्मचारी यांच्यासह नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. वन विभागाची रेस्क्यू टीम घटनास्थळी पोहोचली असून बिबट्याचा शोध सुरू असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. लोहगाव विमानतळाच्या मुख्य रनवेजवळ असलेल्या रनवेच्या जवळ बिबट्याचे प्रथम दर्शन झाले. याबाबत तत्काळ विमानतळाच्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांनी माहिती कळवली. सुरुवातीला वन विभागाला जंगली मांजर असल्याचा कॉल करण्यात आला. वनविभागाकडून तत्काळ एक टीम घटनास्थळी पाठवून देण्यात आली आहे. या घटनेने लोहगाव विमानतळावरील अधिकारी, कर्मचारी आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लोहगावमधील परिसरातही घबराहट पसरली आहे. याबाबत बोलताना वन विभागाचे वन अधिकारी सुरेश वरद म्हणाले, वन विभागाला बिबट्या आढळून आल्याची माहिती मिळताच एक टीम घटनास्थळी रवाना केली आहे. बिबट्याचा शोध सुरू असून लवकरच बिबट्याला रेस्क्यू करण्यात यश येईल. पंचमिया (रेस्क्यू टीम प्रमुख)विमानतळावर बिबट्या असल्याचा कॉल आल्यानंतर त्वरित पहिली टीम घटनास्थळी पाठवून देण्यात आली आहे. बिबट्या सदर ठिकाणी असल्याची खात्री झाली असून आता दुसरी टीम सुद्धा घटनास्थळी पोहचेल

# पीसीएमसीच्या उद्यानांमध्ये पहिल्यांदाच कॅशलेस प्रवेश

◆ पिंपरी(प्रतिनिधी):

कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने शहरातील १० लोकप्रिय उद्यान आणि इतर सुविधांमध्ये एकूण १३ पॉइंट-ऑफ-सेल म्हणजेच पीओएस मशिन्सची व्यवस्था केली आहे.

पीसीएमसीच्या उद्यानांमध्ये पहिल्यांदाच पीओएस मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. यापूर्वी प्रवेश शुल्कासाठी फक्त रोख व्यवहार स्वीकारले जात होते. आता या नव्या प्रणालीमुळे नागरिक पीओएस मशिनद्वारे प्रवेश शुल्क भरणार असून, प्रत्येक व्यवहारासाठी एक प्रत्येक व्यवहारासाठी एक नवीन डायनॅमिक क्यूआर कोड तयार होईल. त्यामुळे प्रत्येक पेमेंटची नोंद राहील आणि व्यवहार पारदर्शक होतील.

या उपक्रमाविषयी बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "उद्यानांमध्ये पीओएस मशिन्सचा वापर सुरू केल्यामुळे आम्ही अधिक पारदर्शक आणि जबाबदार प्रणाली निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रत्येक व्यवहाराचा डिजिटल ठसा राहिल्याने नागरिकांचा विश्वास वाढेल आणि त्यांना अधिक सोय होईल." उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे म्हणाले, "पीओएस आधारित कॅशलेस प्रणालीमुळे कामकाजात सुसूत्रता येईल आणि उद्यानांच्या प्रवेश व्यवहारांचे अधिक प्रभावीपणे निरीक्षण आणि लेखापरीक्षण करता येईल. ही आपल्या सुविधांच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठी झेप आहे."

सदर पीओएस मशिन्स भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (२ मशिन्स), राजमाता जिजाऊ उद्यान (डायनासोर गार्डन) (२ मशिन्स), दुर्गादेवी उद्यान (१ मशिन), वीर सावरकर उद्यान (१ मशिन), बर्ड व्हॅली उद्यान (१ मशिन), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान (१ मशिन), भोसरी सहल केंद्र (१ मशिन), थेरगाव बोट क्लब (१ मशिन), गुलाब पुष्प उद्यान (ऑफिस - १, नेहरूनगर - १), सेंट्रल नर्सरी (१ मशिन) याठिकाणी बसवण्यात आल्या आहेत.

# 'नीट यूजी'मध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी 'एनटीए' सतर्क

◆ पुणे (प्रतिनिधी):

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे (एनटीए) राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षेबाबत (नीट यूजी) संशयास्पद दावे करणाऱ्यांविरोधात तक्रार नोंदवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. त्यानुसार ४ मे रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत संशयास्पद दाव्यांबाबत तक्रार नोंदवता येणार असल्याची माहिती एनटीएकडून देण्यात आली आहे. गेल्यावर्षीच्या नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे उघडकीस आले होते. या प्रकारामुळे देशभरात खळबळ उडाली.

या प्रकरणी काहींना अटकही करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, एनटीएकडून ४ मे रोजी देशभरातील ५५२ शहरे, परदेशातील १४ शहरांमध्ये 'नीट यूजी २०२५' परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे. ही परीक्षा दुपारी दोन ते पाच या एकाच सत्रात घेतली जाणार आहे. लाखो उमेदवारांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे.

# सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलास मुहूर्त; महाराष्ट्रदिनी अजित पवारांच्या हस्ते उद्घाटन

◆ पुणे (प्रतिनिधी):

सिंहगड रस्त्यावरील (नरवीर तानाजी मालुसरे रस्ता) विठ्ठलवाडी ते फन टाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपूल खुला करण्यास अखेर मुहूर्त मिळाला आहे. या एकेरी उड्डाणपुलाचे उद्घाटन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी सकाळी सात वाजता उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. यामुळे राजाराम पुलाकडून वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची महाराष्ट्रदिनी वाहतूककोंडीतून मुक्तता होणार आहे.

सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने राजाराम पूल चौक ते फन टाइम थिएटर यादरम्यान अडीच किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे काम हाती घेतले आहे. या उड्डाणपुलाचे काम २१ सप्टेंबर २०२१ मध्ये सुरू करण्यात आले असून ७१ पिलर्स आणि १०६ गर्डर उभारलेले आहेत. विठ्ठलवाडीकडून स्वारगेटकडे येण्यासाठी राजाराम पूल चौकात उभारलेला उड्डाणपूल यापूर्वीच वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यान एकेरी उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे, तर माणिकबाग ते विठ्ठलवाडी यादरम्यानच्या एकेरी पुलाच्या दोन्ही बाजूंच्या रॅम्पचे काम सुरू आहे.

विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपूल मार्चअखेर, माणिकबाग ते विठ्ठलवाडी यादरम्यानचा उड्डाणपूल डिसेंबरअखेर वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे. विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊनही केवळ उद्घाटनासाठी केवळ नेत्यांची वेळ मिळत नसल्याने तो वाहतुकीसाठी खुला केला जात नव्हता. उड्डाणपुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हावे, यासाठी भाजपची नेतेमंडळी प्रयत्नशील होती. उद्घाटनाचा मुहूर्त ठरल्याचेही भाजपकडून सांगण्यात येत होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रविवारी, दि. २७ एप्रिल रोजी उड्डाणपुलाचे उद्घाटन होणार असल्याचे सांगितले जात होते. त्यातच दोन दिवस मुख्यमंत्री शहरात होते. त्यामुळे उड्डाणपुलाचे उद्घाटन होईल, अशी आशा होती. मात्र, उद्घाटन झाले नाही. त्यामुळे समाजमाध्यमातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली.

त्यानंतर तातडीने सूत्रे हलली आणि उड्डाणपुलाच्या उद्घाटनाचा मुहूर्त अखेर १ मे रोजी सकाळी ७ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्याचे ठरले. त्यामुळे महाराष्ट्रदिनी राजाराम पूल चौकातून वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार आहे.

# विभागीय माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीबाबत आवाहन

**पिंपरी :** विभागीय माहिती कार्यालयातील मराठी,हिंदी व इंग्रजी दैनिके,साप्ताहिके व इतर किरकोळ जमा झालेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी ज्यांना वृत्तपत्राची रद्दी घ्यावयाची आहे. त्यांनी आपली दरपत्रके दि. २ मे २०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत कार्यालयात बंद लिफाफ्यात द्यावीत. लिफाफ्यावर 'रद्दीसाठी दरपत्रके' असा उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही, असे आवाहन उपसंचालक (माहिती), पुणे यांनी केले आहे. तसेच रद्दी विक्रीबाबतची माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. दरपत्रके पाठविण्यासाठी कार्यालयाचा पत्ताः उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१ कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक : ०२० - २६१२३४३५ असा आहे.

# अनाथालय, वृद्धाश्रमात मिळाला 'आपुलकीचा अक्षय गोडवा'

◆ पिंपरी (प्रतिनिधी):

''दादा तू आला आणि कुणाला आपल्या आईची आठवण आली तर कुणाला दूर परदेशात असलेल्या मुलांची कुणाच्या चेहऱ्यावर हसू उमटले. किमान आजचा एक दिवसतरी..! तुझ्याकडून अशीच लोकांची, वंचितांची सेवा घडोअसा अशीर्वाद देते...बाळा खूप मोठा हो'' हे हृदयस्पर्शी शब्द आहेत, एका वृद्धाश्रमातील आजीचे..! निमित्त होते आंबा महोत्सव.

समाजातील दुर्लक्षित आणि निराधार व्यक्तींसोबत सण-उत्सव साजरा झाला पाहिजे. या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून ''आंबा महोत्सव'' साजरा करण्यात आला. ''गोडवा आपुलकीचा, अक्षय समाजसेवेचा'' या संकल्पनेतून

### शहरात विविध संस्थांमध्ये १००० डझन आंब्यांचे वाटप



शहर आणि परिसरातील वृद्धाश्रम, अनाथाश्रम, दिव्यांग भवन, अंध शाळा असे एकाच दिवशी तब्बल ३० ठिकाणी अबालवृद्धांनी आंब्यांचा आस्वाद घेतला. १००० हून अधिक डझन आंबे वाटप करण्यात आले.

वडिलधारी मंडळी आणि समाजातून दुर्लक्षीत असलेल्या निराधारांसोबत हा सण साजरा करण्यात आला. विविध स्तरातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला. प्रमुख ठिकाणी आमदार लांडगे यांनी स्वतः सहभाग घेत अबालवृद्धांसोबत काही क्षण आनंदात साजरे केले. आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात मानवतेच्या दृष्टीकोनातून प्रत्येकाने खारीचा वाटा म्हणून सामाजिक कार्य करावे, असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.

### पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली...!

पहलगाम येथे झालेल्या आंतकवादी हल्ल्याचा निषेध आणि बळी गेलेल्या निष्पाप हिंदू बांधवांना श्रद्धांजलीही वाहण्यात आली. देशभक्तीपर गीते आणि भारताची एकता टिकवण्यासाठी सर्वांनी भारतीय म्हणून एकत्र आले पाहिजे, असा संकल्प करण्यात आला आणि आंबा महोत्सवाची सुरुवात केली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत आमदार लांडगे यांनी आमसर–पुरी भोजनाचा आस्वाद घेतला. त्यांच्याशी संवाद साधला आणि यापुढील काळात आपला मुलगा, बंधू आणि कुटुंबाचा सदस्य म्हणून सर्वोतोपरी मदतीसाठी तत्पर राहील, असा विश्वासही दिला.

## एसएसपीयू आणि युनेस्को यांच्यात सामंजस्य करार

# स्किल डेव्हलपमेंट अँड टीव्हीईटी या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

◆ पुणे (प्रतिनिधी):

"शासनाच्या माध्यमातून कौशल्य विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनेतून समाजाला चांगले फलित मिळतात. त्यामुळे मंत्र्यांनी समोर येऊन सर्वांच्या प्रगतीसाठी नव्या गोष्टी मांडाव्यात."असे विचार महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, युनेस्को आणि एनएसडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने स्किल डेव्हलमेंट अँड टीव्हीईटी या विषयावर आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

यावेळी अध्यक्षस्थानी सिम्बायोसिसचे अध्यक्ष डॉ.





शां. ब. मुजुमदार हे होते. तसेच युनेस्को युनिवोकचे फेडरिक युब्लर, लडाख येथील एचआयएचे संस्थापक संचालक सोनम वांगचुक, पीसीएमसीचे आयुक्त शेखर सिंग व सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या (एसएसपीयूच्या) प्र कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार हे उपस्थित होते. जागतिक शिक्षणाचे आदान प्रदान करणे, नावीण्यपूर्ण शिक्षणाची पद्धती व क्षमता निर्माण करण्यासाठी एसएसपीयू आणि युनेस्को यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. तसेच पहलगाममधील दुखद घटनेबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली वाहिण्यात आली.

डॉ. निलम गोऱ्हे म्हणाल्या," महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यातील कौशल्या गुणांना अधिक वाव दयावा. त्यांच्या दिसण्यापेक्षा त्यांच्या गुणांना प्रोत्साहन देने काळाची गरज आहे. समाजात त्यांचे स्थान अधोरेखित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. तसेच शाश्वत विकासासाठी ग्रामिण क्षेत्रातील पर्यावरण, जल आणि आरोग्यासाठी कौशल्य अत्यंत महत्वाचे आहे."

सोनम वांगचुक म्हणाले," शिक्षण क्षेत्रातील एआय व इंटरनेट गोष्टीने संपूर्ण जग बदलल आहे. जुन्या काळात शिकण्याची पद्धत ही सर्वोत्तम असल्याने बुद्धीमत्तला अधिक जोर द्यावा लागत असे. जीवनात प्रात्यक्षित शिक्षणाबरोबरच अध्यात्मिक शिक्षण महत्वाचे आहे. हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. इंडस्ट्रीमध्ये स्किल्ड मॅन पॉवरची गरज आहे. नवी शिक्षण पद्धती खूप चांगली असली तरी त्याचे प्रात्यक्षात उतरणे महत्वाचे आहे. विद्यापीठ हे केवळ माहितीचे स्त्रोत राहिले आहे. त्यामुळे भविष्यातील शिक्षण पद्धतीत बदल घडावे. अत्याधुनिक काळात शिक्षकांनी स्वतःची भूमिका बदलने गरजेचे आहे. भविष्यात ब्राइट हेड, स्किल हॅन्ड आणि हार्ट या तीन गोष्टी सर्वात महत्त्वाचे असतील. प्रत्येक कॉलेज आणि विद्यापीठ हे कौशल्यपूर्ण असावे."

डॉ. शां. ब. मुजूमदार म्हणाले," युवकांच्या या देशात त्यांच्या कौशल्य गुणांना वाव देऊन त्या पद्धतीचे रोजगार उपलब्ध करून द्यावेत. त्यामुळे येथे युवकांना रोजगार शोधण्याची गरज पडणार नाही तर रोजगार त्यांच्याकडे येईल. वर्तमानकाळात इंडस्ट्री आणि विद्यापीठामध्ये योग्य समन्वय साधून त्याचा उपयोग केला पाहिजे. देश प्रगतीसाठी महिला सशक्तीकरण सर्वात महत्वाचे आहे."

# दोन-तीन दिवसांत अवकाळी पावसाची शक्यता

◆ पुणे (प्रतिनिधी):

यंदा मार्चच्या सुरुवातीपासूनच उष्णतेची तीव्रता वाढली आहे. मागील आठवडाभर विदर्भात तापमानाने नवनवे उच्चांक गाठले. तापमानात मोठी वाढ झाल्याने विदर्भासह संपूर्ण राज्यभर तीव्र उन्हाच्या झळा सोसाव्या लागल्या. उष्णतेच्या लाटेची डोकेदुखी सहन केल्यानंतर वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या हजेरीला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. यात शेतपिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पुढील दोन-तीन दिवसांत तापमानात घट होईल आणि राज्याच्या अनेक भागांत अवकाळी पाऊस पडेल, असे हवामान अभ्यासकांचे मत आहे.

विदर्भासह अनेक भागांत उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसल्यानंतर राज्यात पुन्हा अवकाळी पावसाची हजेरी लागण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. गेल्या आठवडयात कित्येक ठिकाणी तापमानाचा पारा ४५-४६ अंशांवर गेला होता. त्यानंतर वातावरणात अचानक मोठा बदल झाला आहे. अवकाळीचे ढग दाटण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडू शकतो, असे भाकीत हवामान शास्त्रज्ञांनी केले आहे.

### या जिह्यांत पावसाची हजेरी ?

सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, नाशिक, पुणे, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर.



### तीन महिन्यांत जगभर तापमानवाढ तीव्र होणार :

राज्यासह देशभरात उष्णता भयंकर वाढली आहे. याचदरम्यान जागतिक हवामानशास्त्र संघटनेने नव्या धोक्याची घंटा वाजवली आहे. पुढील तीन महिन्यांत जगभरात तापमानवाढ अधिक तीव्र होईल. उत्तर दक्षिण प्रशांत, पूर्व आशिया आणि अरब या भागात उष्णता उच्चांक गाठेल, असा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने वर्तवला आहे. मे ते जुलैदरम्यान जगातील बहुतांश भागात पारा वाढू शकतो, असे हवामानशास्त्र संघटनेने म्हटले आहे.

# योनिस्राव व संसर्ग

स्त्रियांच्या आरोग्याचा विचार करताना गुप्तांगांचे आरोग्य खूप महत्त्वाचे असते. त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे योनिस्राव (vaginal discharge) आणि योनिसंक्रमण (vaginal infection). बहुतांश स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात कधीनाकधी तरी योनिसंक्रमणाचा त्रास होतो. काही वेळा ही स्थिती सामान्य असते, पण काही वेळा ती गंभीरही होऊ शकते. म्हणूनच याबाबत जागरूकता व योग्य उपचार गरजेचे असतात.

### योनिसंक्रमण म्हणजे काय?

योनिसंक्रमण म्हणजे योनीमध्ये जंतूंच्या वाढीमुळे निर्माण होणारा दाह, खाज, दुर्गंधीयुक्त स्राव इत्यादी त्रास. सामान्यतः योनीमध्ये काही चांगले बॅक्टेरिया (जसे की lactobacillus) असतात, जे तेथील ॲसिडिक वातावरण राखतात आणि संसर्ग टाळतात. मात्र कधी कधी या संतुलनात बिघाड होतो आणि हानिकारक जंतूंना वाढायला संधी मिळते.



स्त्री आरोग्य
डॉ. स्नेहल पाटील

### योनिसंक्रमणाची कारणे:

**१. बॅक्टेरियल व्हजिनोसिस (Bacterial Vaginosis):**
हे संसर्ग प्रामुख्याने अशुद्ध बॅक्टेरियांच्या वाढीमुळे होते. स्राव पातळ, राखाडी आणि मासासारखा वास असलेला असतो. बहुधा ही समस्या लैंगिक संबंधामुळे होते, पण नेहमीच तसे नसते.

**२. यीस्ट इन्फेक्शन (Candida infection):**
हे एक बुरशीजन्य संक्रमण आहे. स्राव पांढरट, दाट आणि पनीरासारखा असतो. यासोबत खाज, दाह, आणि मूत्रतळाशी जळजळ जाणवते.

**३. Trichomoniasis:**
हे एक परजीवीजन्य संक्रमण आहे. स्राव हिरवट-पिवळसर, फेसाळ व तीव्र वास असतो. हे लैंगिक संबंधातून संक्रमित होते.


४. गर्भनिरोधक गोळ्या, अंतर्गर्भीय उपकरणे (IUD), अँटीबायोटिक्स यांचा अति वापर – हे शरीरातील नैसर्गिक जंतूंचे संतुलन बिघडवू शकतात.

**५. स्वच्छतेची कमतरता किंवा अति स्वच्छता (douching):**
योनीची खूप स्वच्छता करताना अंतर्गत चांगले बॅक्टेरिया देखील नष्ट होतात, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.

### लक्षणे:

- खाज, जळजळ, किंवा वेदना
- दुर्गंधीयुक्त, रंगीत स्राव
- लैंगिक संबंधांच्या वेळी वेदना
- लघवी करताना जळजळ
- योनी व तिच्या आजूबाजूच्या भागावर लालसरपणा, सूज

निदान : रुग्णाची केस हिस्टरी, तपासणी,




आणि काही वेळा योनी स्रावाची तपासणी करून संसर्गाचे स्वरूप ओळखले जाते. काही वेळा pH टेस्ट, मायक्रोस्कोप तपासणी किंवा कल्चर टेस्ट केल्या जातात.

### उपचार:

उपचार संसर्गाच्या प्रकारावर अवलंबून असतात :
- बॅक्टेरियल व्हजिनोसिस – अँटीबायोटिक गोळ्या किंवा जेल .
- यीस्ट इन्फेक्शन – अँटी-फंगल गोळ्या, क्रीम्स.

### घरगुती उपाय:

- दही किंवा प्रोबायोटिक पदार्थ खाणे – चांगल्या बॅक्टेरियांची वाढ होते.
- कपड्यांचे योग्य प्रकार – सूती अंतर्वस्त्र वापरणे आणि घट्ट कपडे टाळणे.
- पाणी भरपूर पिणे व स्वच्छता राखणे.

### प्रतिबंध:

१. लैंगिक संबंधांदरम्यान संरक्षण (कंडोम) वापरणे.
२. स्वच्छ, कोरडे कपडे वापरणे.
३. योनीस्वच्छतेसाठी सौम्य व pH संतुलित साबण वापरणे.
४. अनावश्यक अँटीबायोटिक्स किंवा अंतर्गर्भीय उपकरणांचा वापर टाळणे.
५. Douching टाळा – यामुळे चांगले बॅक्टेरिया नष्ट होतात.

डॉक्टरांशी संपर्क कधी करावा?
- स्राव खूप तीव्र व वास असलेला असल्यास
- योनीतून रक्तस्राव होत असल्यास
- वारंवार संसर्ग होत असल्यास
- गर्भवती असाल आणि अस्वस्थ वाटत असल्यास

### निष्कर्ष:

स्त्रियांनी आपल्या गुप्तांगाच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. योनिसंक्रमण ही सामान्य पण दुर्लक्षित समस्या आहे. योग्य माहिती, स्वच्छता आणि तज्ज्ञांचा सल्ला यामुळे ती सहजपणे टाळता व बरी करता येते. लाज न बाळगता वेळेवर तपासणी करून घेणे हेच सर्वोत्तम उपाय आहेत. आपल्या शरीराच्या प्रत्येक भागाचे आरोग्य जपणे म्हणजेच एक सक्षम आणि आरोग्यदायी स्त्री बनणे होय.

drsnehalspatil@gmail.com



# चांदीच्या पैंजणचे सुंदर ८ डिझाइन पाहा!

महिलांना त्यांच्या पायांचे सौंदर्य वाढवण्यासाठी अँकलेट परिधान करायला फार आवडते. विवाहित महिलांसोबतच अविवाहित मुलींनाही अँकलेट घालायला आवडते. सध्या मार्केटमध्ये अँकलेटसच्या फार डिझाइन पाहायला मिळतात. तुम्हालासुद्धा अँकलेटस घालायला आवडत असतील तर आम्ही तुमच्यासाठी चांदीच्या अँकलेटचे असे डिझाइन घेऊन आलो आहोत जे पाहून तुम्ही सुद्धा खरेदी करू शकता.



सौंदर्य तुझं
प्राची शिरकर



### भरगच्च घुंगरू पैंजण

जर तुम्हाला पैंजणांच्या घुंगरांचा आवाज फार आवडत असेल तर तुम्हाला या प्रकारचे पैंजण नक्कीच आवडतील. तुम्ही त्यात अनेक घुंगरू घालू शकता.



### पायांचे सौंदर्य

विवाहित महिला आणि नववधूंच्या पायांवर पायाची फुले खूप छान दिसतात. यामध्ये, पायाची अंगठी अँकलेटसह जोडलेली असते. त्यामुळे लग्नासाठी पैंजण म्हणून ही अतिशय सुंदर डिझाइन आहे.



### सोबर अँकलेट

आधुनिक अँकलेट डिझाइन पायामध्ये खूप छान दिसतात. जर तुम्ही कुर्ती परिधान केली असेल तर तुम्ही या प्रकारच्या डिझाइनचा वापर नक्की करू शकता.



### चैन डिझाईन

या अँकलेटची ही डिझाइन एकदम सोबर दिसते. एक साखळी आणि त्याच्यावर केलेलं फुलांचं काम हे पायात बघण्यासाठी खूप सुंदर दिसतं.



### स्टायलिश अँकलेट डिझाइन

जर तुम्हाला खूप रंगीबेरंगी अँकलेट डिझाइन आवडत नसतील, तर तुम्हाला हे डिझाइन नक्कीच आवडेल. अतिशय सुंदर आणि भरगच्च दिसणारं पैंजण तुमच्या पायांचे सौंदर्य नक्कीच वाढवेल.



### नाणे अँकलेट डिझाइन

आता ही डिझाइन नेकलेस म्हणा किंवा गळ्यातल्या चोकरमध्ये पाहायला मिळतेच. मात्र आता अँकलेटमध्ये ही साजेशी डिझाइन खूप ट्रेंडमध्ये आहे. या प्रकारच्या पॅटर्नचे अँकलेट एथनिक आउटफिट्ससोबत सुंदर दिसतात.



### सुंदर अँकलेट डिझाइन

अँकलेटमध्ये या प्रकारची डिझाइन पसंत केली जाते. हे पैंजण एकदम साधं आहे, पण यांची बांधण्याची पद्धत वेगळी आहे.

### बाजूबंद डिझाइन पैंजण

बाजूबंदासारखी डिझाइन आता पैंजणमध्ये सुद्धा पाहायला मिळते. तीन चार चैनची एक साखळी बनवून त्याच्यामध्ये रंगीबेरंगी डीझाइन तयार करून हे अँकलेट बनवलेलं असतं. कोणत्याही समारंभाला तुम्ही हे पैंजण हमखास घालू शकता.

# ‘कला-साहित्याची अक्षय्य ऊर्जा’

सुप्रभात मैत्रिणींनो,
आज अक्षय्य तृतीया, कधीही क्षय न होणाऱ्या संपन्नतेचा, समृद्धतेचा, आनंदाचा आणि नावीन्याचा ध्यास देणारा शुभमुहूर्त! आजच्या या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या कलेच्या आणि साहित्याच्या क्षेत्रात अखंड ऊर्जा देणारे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजेच हर्षदा संजय बोरकर. सुप्रसिद्ध दिग्दर्शिका, लेखिका, निवेदिका, नृत्यांगना यांच्या तेजोमय प्रवासाबद्दल आपण जाणून घेणार आहोत.

हर्षदाताईं भेटताच त्यांच्या चेहऱ्यावरील मृदुभाव, बोलके डोळे, गालावरची सुंदरशी खळी, आपुलकीने व प्रभावीपणे बोलण्याची शैली आणि त्यांचा चैतन्यमयी वावर मनावर गारुड घालतो, पहिल्या क्षणापासूनच आपल्या मनाचा ठाव घेतो.

लहानपणापासूनच वक्तृत्व, कथाकथन, नृत्य या क्षेत्रांमध्ये त्या आघाडीवर होत्या. त्यांच्या कलेचे संस्कार त्यांना कलासक्त आई-वडिलांकडून, कीर्तनकार असणाऱ्या आजींकडून आणि सरस्वती विद्यामंदिर शाळेतून मिळाले. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर त्यांनी गुरु पूनम मुर्डेश्वर यांच्याकडून भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेतले. आणि एकांकिका, बालनाट्य स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. ‘माझ्यातील कलागुण म्हणजे, ईश्वराची माझ्याकडून असलेली अपेक्षा’ हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरचे श्रीकृष्णाच्या भक्तीचे भाव आपसूकच उमटलेले दिसतात.



वैशाली गायकवाड

वैशाली आंबीकर या नावाने माहेरच्या घरातून आलेल्या हर्षदाताईंना लग्नानंतर साहित्य क्षेत्राशी जोडलेल्या घरात उत्तम पाठिंबा मिळाला. सुप्रसिद्ध वकील असलेले पती संजय बोरकर आणि प्रतिभावान समीक्षक सासरे दादा बोरकर यांच्या सहकार्यामुळे त्यांच्यातील लेखिका, निवेदिका आणि दिग्दर्शिका घडली.

आई म्हणून जबाबदाऱ्या सांभाळतानाही, त्यांनी स्वतःच्या ‘मी’ चा शोध घेतला. वाचन, लेखन आणि निवेदन यात सातत्य ठेवत स्वतःची वेगळी शैली विकसित केली. त्यांच्या निवेदनाने विविध व्यासपीठांवर रसिकांचे मन जिंकले.

हर्षदाताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा खास पैलू म्हणजे नृत्य, अभिनय, दिग्दर्शन, लेखन आणि निवेदन यांचा सुरेख संगम. त्या केवळ कुशल नृत्यांगना आणि अभिनेत्रीच नाहीत, तर नृत्यदिग्दर्शक, नाट्यदिग्दर्शक, कथा-नाट्य लेखिका म्हणूनही त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

त्यांचा प्रवास हा फक्त स्वतःच्या प्रगतीसाठी नाही, तर समाजातील दुर्बल घटकांसाठी आहे. विशेषतः गतिमंद व मतिमंद मुलांसाठी ‘विश्वास चॅरिटेबल ट्रस्ट’ या संस्थेत त्या आत्मभान जागृत करण्याचे, संवाद कौशल्य विकसित करण्याचे आणि आत्मविश्वास वृद्धीचे दैवी कार्य करत आहेत आणि या संवेदनशील कामात आपल्यासह मित्र-मैत्रिणी, बहिणी, जावा अशा अनेकांना त्यांनी जोडून घेतले आहे.

ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरींच्या प्रेरणेने त्या ‘वंचितांचा रंगमंच’ या चळवळीशी जोडल्या गेल्या आहेत. रंगभूमीच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांना व्यक्त होण्याची संधी देण्याचे कार्य त्या अविरत करत आहेत. तसेच, ‘ठाणे आर्ट गिल्ड’च्या पदाधिकारी म्हणून नवोदित कलाकारांना सर्जनशीलतेची दिशा देत आहेत.

हर्षदाताई या फक्त कलावंत नाहीत, तर सामाजिक जाणीवेने समृद्ध व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून अध्यात्म आणि कलेचा संगम घडवला आहे, तर ‘माझी



कर्तृत्ववान ती राज्ञी

माय सरसोती’ आणि ‘जन्मवारी’ सारख्या नाट्यदिग्दर्शनातून समाजातील विषयांवर प्रभावी भाष्य केलं आहे.

जन्मवारी या नाटकासाठी त्यांच्या उत्तम लेखन कौशल्याला शासनाने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्याचबरोबर विविध संस्थांनी त्यांना पुरस्कृत केले आहे.

वाचन संस्कृती रुजविण्यासाठी त्या अभिवाचन, वक्तृत्व, कथाकथन, निबंध स्पर्धा असे वैविध्यपूर्ण उपक्रम राबवतात आणि त्यांचे परीक्षण व मार्गदर्शन प्रभावीपणे करतात.

पुढील वाटचालीत व्यावसायिक नाटकांचे दिग्दर्शन करून समाज परिवर्तन घडवून आणणारी नाटकं रंगभूमीवर आणण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांची मुलगी शांभवी ही देखील उत्तम संहिता लेखन करते व तिने अमेरिका इथून फिल्म मेकिंगचे शिक्षण घेतले आहे. जन्मवारी आणि ज्याची त्याची लव स्टोरी फेम सून शर्वरी हिच्या अभिनयाने, कलेने कला साहित्याचा हा प्रवाह अखंड वाहता राहणार आहे.

आजच्या या धावपळीच्या आणि टेक्नॉलॉजीच्या युगात आयुष्यात येणाऱ्या वळणं-वाटांवर शक्य असल्यास थोडसं थांबून, त्या त्या बदलांचा आनंद घेत नदीप्रमाणे अविरत वाहत राहायचं आणि वाहताना कोणत्याही गोष्टीत फार न अडकता आपल्या सोबत असणाऱ्यांचं जीवनदेखील समृद्ध करत जाण्याचा मोलाचा सल्ला त्या समस्त महिलांना देतात. नदीप्रमाणेच खळाळत्या आनंदाने आपल्या प्रवासात आपण मार्गक्रमण करत राहिल्याने प्रत्येकीतील “मी” ही आज ना उद्या आपल्याला सापडतेच.

हर्षदा ताईंच्या कलेत संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि तळमळ दिसते जी समाजात सकारात्मक परिवर्तन घडवते. अशा व्यक्तिमत्त्वांमुळेच कला अधिक अर्थपूर्ण बनते आणि समाजाशी अधिक सशक्तपणे जोडली जाते. अत्यंत समर्पित भावनेने कला साहित्याचा जागर करणाऱ्या या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाला राज्ञी वुमन वेल्फेअर असोसिएशनकडून पुढील वाटचालींसाठी भरभरून शुभेच्छा.

Vaishu.gaikwad78@gmail.com

# आमरस पूरण पोळी

अक्षय्य तृतीया म्हणजे आनंदाचा आणि शुभेच्छांचा दिवस. या दिवशी गोड पदार्थ करून देवाला नैवेद्य दाखवायचा आणि घरात गोडवा पसरवायचा असा सुंदर रिवाज आहे. या खास दिवशी जर काहीतरी हटके आणि पारंपरिक गोड हवं असेल, तर ‘आमरस पूरण पोळी’ हा एक उत्तम पर्याय आहे. आंब्याचा रस आणि पुरण यांची मिळून तयार झालेली ही पोळी प्रत्येकाला नक्कीच आवडेल.

हरभऱ्याच्या डाळीच्या सुवासिक पुरणात गोडसर आंब्याच्या रसाची आंबट-गोड चव मिसळून तयार झालेली ही पोळी, सणाच्या थाटात एक नवा गोड सोहळा घालून देते. गव्हाच्या पोळ्यांमध्ये भरलेले हे आम्रखुशीत पुरण आणि वरून साजूक तुपाचा मंद सुवास यामुळे प्रत्येक घास गोड आठवणींनी भरून जाईल.



सुग्रास सुगरण
गायत्री डोंगरे

**साहित्य:**
हरभऱ्याच्या डाळीचं पूरण-१ कप
आंब्याचा रस-१/२ कप
साखर-चवीनुसार
गव्हाचे पीठ-पोळीसाठी
तूप-भाजताना





**कृती:**
पूरण तयार करताना शेवटी आंब्याचा रस आणि थोडी साखर घाला. गव्हाच्या पिठात साधं पाणी घालून मऊसर पीठ मळा. छोटा गोळा घेऊन मध्यम आकाराची पोळी लाटा, मधोमध पूरण भरून हलक्या हाताने पोळी लाटा. तुपात मध्यम आचेवर भाजा.

**सजावट आयडिया:**
- गरम पोळीवर साजूक तूप सोडा आणि फुलपाखरू आकारात कापून सर्व्ह करा. बरोबर आंब्याचा घट्ट रस बाजूला द्या.
- तुमच्या परिवारासोबत अक्षय्य तृतीयेचा गोड अनुभव घेण्यासाठी ही पोळी नक्की तयार करा.

# “संवाद प्रश्नोत्तरांतून”

सख्यांनो, गेले काही लेख मी आसनं आणि प्राणायामांविषयी माहिती देत आहे. खरंतर या सदरामधून तुम्हा सर्व योगिनींशी संवाद साधण्याचा माझा मनोदय होता; परंतु मागील काही लेख वाचल्यानंतर तुम्हाला वाटत असेल की इथे संवाद कुठे आहे?

हे तर सगळं एकतर्फीच बोलणं चाललं आहे म्हणजे मीच काय ती बोलत आहे. म्हणूनच सख्यांनो, या दोन लेखांत आपण एकमेकांशी संवाद साधणार आहोत.

तुमच्याशी संवाद साधायचं नाही असं काही मनात नव्हतं बरं का. पण आसन आणि प्राणायाम या योगाच्या अत्यंत लोकप्रिय आणि दोन महत्त्वाच्या अंगांची माहिती तुम्हाला दिल्यानंतर तुमच्या मनात उद्‌भवणाऱ्या शंकांच समाधान करत करत तुमच्याशी संवाद साधावा असं मी ठरवलं.



मी योगिनी
डॉ. वैशाली दाबके

मला विश्वास आहे की लेख वाचल्यावर या लेखांमध्ये सांगितलेली काही आसनं आणि प्राणायाम तुम्ही करायला नक्कीच सुरुवात केली असेल परंतु माणसाचं मन ही मोठी विलक्षण गोष्ट आहे. एखादी गोष्ट आपण विश्वासानं सुरवात करतो, जरा कुठेतरी शंकेची पाल चुकचुकते आणि मनात प्रश्नांचे धुमारे निर्माण व्हायला सुरवात होते.

अशाच काही तुमच्या मनातल्या प्रश्नांची उत्तरं मी आता देणार आहे.

चला तर मग, प्रश्न तुमच्या मनातले आणि उत्तरं माझी.

■ **या लेखमालेत सांगितल्याप्रमाणे मी काही आसनं नियमितपणे करायला सुरुवात केली आहे. माझी सात वर्षांची लहान मुलगीही मला बघून तशीच आसनं करायचा प्रयत्न करते. हे योग्य आहे का? आसनं कोणत्या वयापासून करावीत?**

- वयाच्या पाचव्या वर्षानंतर साधी सोपी आसनं मुलांना शिकवायला अडचण नाही परंतु योगसाधनेमध्ये अपेक्षित असलेली मानसिक स्थिरता किंवा विविध टप्पे गाठत आसनाच्या अंतिम स्थितीपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेली एकाग्रता मुलांमध्ये असेलच असं नाही. परंतु हळूहळू आठव्या-नवव्या वर्षापासून शारीरिक हालचालींबरोबरच मनाची स्थिरता कशी आणायची हे मुलांना शिकवता येते. अशाप्रकारे आठव्या वर्षानंतर मुलं आसनं अधिक चांगल्याप्रकारे करू शकतात.

■ **अत्यंत व्यस्त वेळापत्रकात आसनं करणं जमत नाही, तर काय करावे?**

तसं पाहिलं तर प्रत्येकाच्या आयुष्यात ही अडचण आहेच. खूप वेळा ही अडचण नसून सबब असते आणि वेळ नसतो यापेक्षा सुद्धा उपलब्ध वेळात कोणत्या गोष्टींना प्राथमिकता द्यावी याविषयी आपल्या मनात गोंधळ असतो. आपल्या नित्य व्यवहारात कोणत्याही व्यायामप्रकाराला आपण प्राथमिकता देत नाही. योगसाधनेचं महत्त्व समजून त्यासाठी दिवसातला वेळ काढून ठेवणं आवश्यक आहे. नव्हे, प्रत्येकानं वेळ काढलाच पाहिजे. दीर्घकाळपर्यंत सक्षम राहण्यासाठी व्यायामासाठी वेळेची गुंतवणूक प्रत्येकासाठी अपरिहार्य आहे. जितक्या लवकर ही गुंतवणूक करू तितक्या दीर्घकालपर्यंत याचे शारीरिक आणि मानसिक लाभ आपल्याला मिळणार आहेत.

■ **आपण काही आसनांविषयी विवेचन केलेलं नाही, तर ती आसनं करावीत की नाही?**

योगसाधना हा विषय अत्यंत व्यापक आणि विस्तृत आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखमालेमध्ये हा विषय इतकंच काय तर योगातील महत्त्वाचे विषयही संपूर्णपणे हाताळणं शक्य नाही म्हणूनच आसनांविषयी लेखांना सुरवात करतानाच नमूद केल्याप्रमाणे या लेखमालेत सर्व आसनांची कृती देणं शक्य नाही. म्हणून दररोज करण्याजोग्या आसनांचाच विचार या लेखमालेत केला आहे. याचा अर्थ असा नाही की बाकीची आसनं करू नयेत. विविध नामांकित संस्था योगासनांचे मासिक, त्रैमासिक, वार्षिक अभ्यासक्रम चालवतात. अशा संस्थांमधून तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आपण इतर आसनंही शिकून घ्यावीत आणि आपल्या नित्य साधनेतही त्यांचा अंतर्भाव करावा. मात्र ती करताना आपल्या शारीरिक मर्यादांचा विचार करावा. एरवी कुठलेही आसन करण्यास काहीच प्रत्यवाय नाही.



■ **वेळेअभावी आसनं जलद वेगानं केली तर चालतील का?**

जलद वेगानं केलेली आसनं आणि व्यायाम यांत काहीच फरक नाही. आसनांचं वैशिष्ट्यच हे आहे की ती प्रत्येक टप्प्याचा अनुभव घेत करायची असतात. व त्यासाठी विशिष्ट, शांत लयीत आसनं करणं अपेक्षित आहे. जलद गतीनं योगासनं केली तर योगासनं म्हणजे निव्वळ कसरत होईल आणि त्याचे लाभ शारीरिक पातळीवरच मर्यादित राहतील. योगसाधना शारीरिक पातळीबरोबरच मानसिक स्तरावरही किंबहुना मानसिक स्तरावरच अधिक उपयुक्त ठरते. म्हणूनच आसनं जलद वेगानं करू नयेत.

■ **स्त्रियांनी मासिक पाळीच्या वेळी योगाभ्यास करावा का?**

मासिक पाळी हा स्त्रियांचा अतिशय नैसर्गिक असा देहधर्म आहे. या काळात बहुतांश स्त्रिया नित्यनियमित कामं करतच असतात. अशी कामं शक्य होत असतील तर योगाभ्यास न जमण्याचं किंवा वर्ज्य करण्याचं काहीच कारण नाही. मात्र अशावेळी खाली डोकं वर पाय अशा अवस्थेतील सर्वांगासन, शीर्षासन यासारखी तसेच कठीण आसनं करू नयेत. ओटीपोटी, कंबर आदी अवयव दुखत असल्यास मनाला शांत करणारं शवासन, दीर्घश्वसन, अनुलोम-विलोम, भ्रामरी यांसारखे प्राणायाम करावेत. आपल्या लेखांमध्ये सांगितलेल्या नित्य निरंतर योगसाधनेतील आसनं करण्यास हरकत नाही.

■ **नियमित योगसाधनेने रोग बरे होतात का?**

ॲलोपॅथी, होमिओपॅथी यांसारखी, योग ही रोग निवारण करणारी उपचारपद्धती नाही. परंतु काही रोगांवर मात्र योग ही उपचारपद्धती म्हणून प्रभावी ठरते.

विषाणूसंसर्ग, अपघात, कुपोषण, आर्थिक सामाजिक परिस्थितीमुळे उद्‌भवणाऱ्या समस्या, अनुवंशिक रोग इत्यादी शारीरिक व मानसिक समस्यांवर योग ही साक्षात उपचारपद्धती नाही.

मनोकायिक समस्यांवर मात्र मन शांत आणि स्थिर करणारी, आसन आणि विशेषतः प्राणायाम ही योगातील अंगं, ओंकारसाधना, शवासन अत्यंत लाभदायी ठरतात. उच्च रक्तदाब, मानसिक तणावामुळे निर्माण होणाऱ्या समस्या नियंत्रित करता येतात.

अशाच काही प्रश्नोत्तरांसह पुढच्या आठवड्यात पुन्हा भेटूया, सख्यांनो.

# सुदृढ आरोग्य प्रत्येकाचा मूलभूत हक्क

**डॉ.ओमप्रकाश शेटे**

**फुले- आंबेडकर जयंती निमित्ताने शिबिर**

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिंद्रुड:आरोग्य तपासणी व मोफत उपचार शिबिराचा उद्देश हा केवळ आरोग्यसेवा देणे नाही, तर सुदृढ आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे या तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हा मुख्य हेतू असल्याचे प्रतिपादन देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. दिंद्रुड येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित मोफत सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जवळपास ५०० महिला पुरुषांची वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. निदान झालेल्या बाधित रुग्णांवर मोफत उपचार करणार असल्याचेही डॉ. शेटे म्हणाले.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे यावर्षी डॉ. आंबेडकर व फुले यांच्या संयुक्त जयंती उत्सव समितीने मोफत सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे होते. तर



तालुका वैद्यकीय अधिकारी मधुकर घुबडे, जनरल फिजिशियन डॉ. यशवंत राजेभोसले, एम. एस. वारकरी, आयुष्मान योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. अशोक गायकवाड, प्रदीप ठोंबरे, संगमचे सरपंच भगवान कांदे, माजी सरपंच अजय कोमटवार आदी मान्यवर उपस्थित होते. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ देशमाने यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुनील वावळकर यांनी तर आभार वैभव देशमाने व विकास देशमाने यांनी मानले.

सदरील शिबिरामध्ये डॉ. यशवंत राजे भोसले (सामान्य चिकित्सक ,मेडिसिन), डॉ. संकेत बाहेती (सामान्य शल्यचिकित्सक (सर्जन), डॉ. महेश काळे (कर्करोग तज्ञ), डॉ. शाहिद शेख ( हृदयरोगतज्ञ), डॉ. गणेश केदार (स्पाइन सर्जन) शल्यचिकित्सक), डॉ. अनिल पवार (यूरोलॉजिस्ट), डॉ. एकनाथ पवार (नेत्ररोग तज्ञ), डॉ.ऋषिकेश चाळक (एम. डी.आयुर्वेद), डॉ.राजश्री हाडबे (बालरोग तज्ज्ञ), डॉ.गणेश काकडे (अस्थिरोग तज्ञ), आदींनी आपल्या स्टाफ सह उपस्थित राहून उत्तम सेवा दिली.

या शिबिरात जवळपास ५०० महिला, पुरुष व बालकांची तपासणी करण्यात आली. १५६ जणांच्या रक्ताचे नमुने तपासण्यात आले. ५५ नेत्रदोष असलेल्यांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. तसेच १ गुडघ्याची व २ अपेंडिक्स शस्त्रक्रिया होणार आहेत. ५ मूत्रपिंडातील पान २ वर

# उन्हामुळे आचनक पेटला ट्रक

दुर्घटना:ट्रकगाडी आगीने जळून खाक



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक( इटके कॉर्नर) या ठिकाणी दुपारी साडेचार ते पाच च्या दरम्यान एका मालवाहू ट्रकला आग लागली. घटनास्थळी पोलिसांनी भेट दिली असून अधिक माहिती ते घेत आहेत. अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणली. मात्र गाडीचे केबिन, लाकडी भाग आणि टायर्स जळून खाक झाले.शहरातील इटके चौक या भागात उभा केलेल्या ट्रक नंबर एम एच २४ जे ७८९६ असा आहे . गाडी आगीने जळून खाक झाली. काहींच्या मते तीव्र उष्णतेमुळे आग लागली तर काहीच मते जवळच चौकात मोठ्या प्रमाणात फटाक्याचे आतिषबाजी करण्यात आली यामुळे आग लागली.

दरम्यान आग विजवण्यासाठी परळी नगर परिषदेचे दोन बंब आले त्यावेळी त्यातील एक फोमची गाडी जात पाणी अत्यंत किंवा नसताच आणि दुसरी गाडीमध्ये वॉटर टँकर होतं सुमारे ६००० लिटर पाणी होते. पाणी कमी पडू नये म्हणून सपोर्टिंग साठी वीज केंद्राचे अग्निशमनलाही सूचित करण्यात आले होते. अशी माहिती नगर परिषदेचे सुनील अदोडे यांनी दिली. दरम्यान औष्णिक वीज केंद्राच्या अग्निशमन विभागाची गाडी तेथे आली आणि पान २ वर

# जन आक्रोश मोर्चाला प्रतिसाद

निवेदन:जन सुरक्षा व वक्फ बोर्ड कायदे रद्द करा



पुण्यभुमी प्रतिनिधी

राहुरी:केंद्र सरकारने महाराष्ट्र जन सुरक्षा कायदा रद्द करा वक्फ बोर्ड व इतर काही नवीन कायदे करण्यात येत आहेत तसेच छ शिवाजी महाराजांचा पुतळ्याची विटंबनेचा घटनेला एक महिना उलटून ही आरोपचा शोध लागत नाही या विरोधात लोकशाही बचाव समन्वयक समितीच्या वतीने राहुरी येथील तहसील कार्यालयावर भारत बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले राहुरी शहरातील वायएमसीए ग्राऊंड येथून मोर्चाला सुरुवात झाली यावेळी आरपीआय उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रवीण लोखंडे, वंचितचे जिल्हा महासचीव अनिल जाधव, लहुजी क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष नंदुभाऊ शिंदे आरपीआयचे तालुका अध्यक्ष विलास साळवे भिम आर्मीचे तानसेन बिवाल, भिम आर्मी स्टुडन्ट फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष दिपक साळवे चंदकांत जगधने वंचितचे संतोष चोळके बाबासाहेब साठे पिंटू नाना साळवे राष्ट्रीय दलीत न्याय हक्क आंदोलनाचे यमुनाताई भालेराव डॉ. जाकिर सय्यद आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले

केंद्र सरकारकडून वक्फ कायदा व इतर पान २ वर

# परळीत सद्भावना संकल्प आंदोलन

बहादुरभाई: ३ तारखेला होणार आंदोलन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक १ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित करण्यात आला होता.परंतु राज्य कमिटीचा दिल्ली येथे महत्वाची बैठक आयोजित केली असल्याने परळीत १मे ऐवजी आता ३ मे रोजी होणार असल्याची माहिती माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी प्रसिद्धी माध्यमाना दिली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील



नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे व माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.

माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी माध्यमाना सांगितले कि,सद्भावना संकल्प सत्याग्रहाच्या जोरदार तयारी करण्यात आली आहे. काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम पान २ वर

# ट्रॅक्टर मोर्चात सहभागी व्हावे

धोरण:डॉ.गोपाल बछिरे यांचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:सातबारा कोरा, विज बिल शून्य, पिक विमा त्वरित मिळण्याकरिता शिवसेना उबाठा चे आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हासंपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, शिवसेना प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांच्या नेतृत्वात दि. २ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर मोर्चा धडकणार आहे, करिता हजारोच्या संख्येने शेतकरी बांधवांनी आपले ट्रॅक्टर घेऊन उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे हे गावोगावी कॉर्नर बैठका घेऊन करीत आहे



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मा. देवेंद्र फडणवीस, मा. अजित पवार, मा. एकनाथ शिंदे यांनी आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून त्यांचा सातबारा कोरा करू, शेतीचे वीज बिल शून्य करू १००% पीक विमा देऊ, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असे अभिवचन दिले होते लोकांनी भरभरून मतदान दिले, महायुतीचे सरकार आले सरकार येताच त्यांनी आपले वचन मोडले व शेतकऱ्यांना ३१ मार्च च्या आत कर्ज भरण्याची ताकीद दिली, विज बिल न भरल्यास वीज प्रवाह कापण्यात येईल असा सज्जड दम दिला, पिक विमा पूर्ण न देता १००, ५०० रुपये देऊन शेतकऱ्यांची थट्टा करण्यात येत आहे, लाडक्या बहिणींना २१०० देण्याच्या ऐवजी ५०० रुपयांवर बोळवण करण्यात येत आहे याच्या विरोधात मेहकर लोणार विधानसभेचे आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, शिवसेना प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांच्या नेतृत्वात दिनांक २ मे पान २ वर

# माहिती न देणे आले आंगलट

दणका: गौतम वाघमारेंवर प्रशासकीय कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:ग्रामपंचायत कार्यालय, निमगाव (मा), ता. शिरूर (का), जि. बीड येथे, भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत एकूण चार मुद्द्यांवरील माहितीची मागणी केली होती. कायद्यानुसार, संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी गौतम वाघमारे यांना ३० दिवसांच्या आत माहिती पुरवणे बंधनकारक होते. मात्र, त्यांनी दुर्लक्ष करत माहिती नाकारली.यासंदर्भात अशोक कातखडे यांनी दिनांक ०३ डिसेंबर २०२४ रोजी पंचायत समिती शिरूर (का) येथे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी व विस्तार अधिकारी एम. एन. गोडे यांनी दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेतली. सुनावणीनंतर, दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी निर्णय



देत अशोक कातखडे यांच्या अपिलाला मंजुरी दिली व ८ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दिले.

तथापि, आदेशाचीही अवहेलना करत गौतम वाघमारे यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे अशोक कातखडे यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांच्याकडे रीतसर तक्रार केली. त्यानंतर गटविकास अधिकारी यांनी दिनांक २५ एप्रिल पान २ वर

# पाणीप्रश्नासाठी कायम शेतकऱ्याच्या सोबत

खा. रजनीताई पाटील यांच्याशी शेतकर्यांची चर्चा



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : सिंदफणा पट्टा व लगतच्या भागात गेल्या दोन वर्षांपासून दुष्काळी परिस्थिती आहे. पाऊस नसल्याने अनेक शेतकर्यांनी फळबागा तोडल्या आहेत तर कोरडवाहू शेतकरीही अडचणीत आले. दुष्काळी भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शेतकर्यांनी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलकांनी खासदार रजनीताई पाटील यांची भेट घेऊन जायकवाडीचे पाणी दुष्काळी भागाला मिळावे यासाठी साकडे घातले.

यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, राजाभाऊ महाराज कुटे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, अजय साळुंके पाटील, गणेश कोळेकर पाटील, सरपंच नवनाथ गवते, श्रीनिवास बेदरे, देविदास चव्हाण, राहुल लोंढे व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. बीड जिल्ह्यातील शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव या तालुक्यातून सिंदफणा नदी वाहते. सिंदफणा नदीवर साखळी बंधारे नसल्याने व जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडण्यासाठी लिफ्ट एरीगेशनची योजना नाही, यामुळे सिंदफणा नदी आठ ते नऊ महिने कोरडीठाक असते. सिंदफणा व गोदावरी नदीच्या मधील भागही दोन्ही नदीच्या पाण्यापासून वंचित आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, उपकालवा करावा यासह इतर पान २ वर

# बोगस कामाची चौकशी करा!

कैलास मुंडे :बीडीओंकडे तक्रार

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील देवगांव येथे रेणुकादेवीचे मंदीर असुन या देवीकडे जाणारा रस्ता खराब झाला असल्याने या भागातील पुढा-यांनी हा रस्ता मंजूर करुण आणून संबधित गुत्तेदाराने या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असुन या बोगस कामाची



तात्काळ चौकशी करुन गुत्तेदार आणि अधिका-यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी कैलास (भाऊ) मुंडे यांनी २८ एप्रिल रोजी केजचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनातून केली आहे. केज तालुक्यातील देवगांव येथे रेणुकादेवीचे मंदीर असुन या देवीकडे मंगळवारी व शुक्रवारी अनेक भाविकभक्त ये-जा करणारा रस्ता खराब झाल्याने या भागातील पुढा-यांनी हा रस्ता मंजूर करुण आनल्यानंतर गुत्तेदाराने देवगाव ते रेणुका देवी मंदिराकडे जाणा-या रस्त्याचे पान २ वर

# कोरडेवाडीतले काम निकृष्ट

चर्चा: केज लघु पाटबंधारे विभागाने कारवाई करावी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील कोरडेवाडी येथे सुरू असलेल्या लघुपाटबंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.लघुपाटबंधाऱ्यांला निधी प्रमाणे काम होत नसल्याचे समजले जाते आहे व काम भोगस करण्यात येत आहे कामाचे स्वरूप लावली जाव टमकी बजाव अशा प्रकारे केले जात आहे असे चर्चा सत्र सुरू आहे तरी लघुपाटबंधारे विभागाचे अधिकारी यांनी काय झोपेचे सोंग घेऊन तेरी चुप मेरी बी चुप असा कारभार सुरू केला आहे का असे नागरिकांन मधुन सुर उमटु लागले आहेत का संमंधीत गुत्तेदारा कडुन लाचलुचपत करुन गप्प बसले आहेत त्यामुळे निकृष्ट दर्जाचे करण्यात येणाऱ्या कामावर संमंधीत प्रशासनाचे लक्ष केंद्रित होत नाही तरी पान २ वर

**पप्पू कागदे**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

# आंबेडकरी विचार तळागाळात पोहोचवा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी, शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देवून या देशातील तमाम उपेक्षीत समुहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठविण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून दिली. आंबेडकरांना अपेक्षीत असलेली चळवळ गतिमान करण्यासाठी युवकांनी संघटीत होवून आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहचविण्याचे काम करावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बोरफडी, मौज, चऱ्हाटा, नाथापूर, खुडूस या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विषमता, भेदभाव यांच्या विरोधात मुकनायक या वृत्तपत्रातून लेखन करून उपेक्षीतांना समता, शिक्षण, हक्क व आपल्या अधिकारासाठी जागृत करून स्वातंत्र्य मिळवून दिले. आगामी काळात आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहचविण्याचे काम युवकांनी करावे. पान २ वर



# जन आक्रोश महा आंदोलन

समारंभ:सचिन साठेंचा यथोचित सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:लातुर येथे डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेना व सकल मातंग समाजाच्या वतीने भालचंद्र बल्ड बँकेच्या सभागृहात दि.२७ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर दि. २० मे २०२५ रोजी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण जन आक्रोश महा आंदोलन मोर्चा होणार असल्याने ते लातुर येथे मातंग समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मार्गदर्शनपर राज्य स्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धाराशिव जिल्ह्याच्या वतीने साहित्य रत्न अण्णाभाऊ पान २ वर